महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३७ वा दिनांक : २६/१०/२०२४ वार : शनिवार

## भाजप हाच खरा संविधानविरोधी पक्ष - नाना पटोले



**मुंबई :** महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक हारण्याच्या भीतीने भारतीय जनता पक्ष सोशल मीडियाच्या माध्यमातून फेक नेरेटिव्ह पसरवत आहे. भारतीय जनता पक्ष हाच खरा आरक्षण व संविधान विरोधी आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या एका विधानाची तोडफोड करून हा पक्ष फेक नेरेटिव्ह पसरवण्याचा प्रयत्न करत आहे. पण त्यांचा हा प्रयत्न महाराष्ट्रात चालणार नाही, असा दावा महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी शुक्रवारी केला.

दिल्ली येथे माध्यम प्रतिनिधींशी बोलताना भाजपाचा समाचार घेत कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने लोकशाही व संविधान धाब्यावर बसवले आहे. आरक्षण संपवणारा पक्ष असा शिक्काच त्यांच्या माथ्यावर पडलेला आहे. हा कलंक पुसण्याचा भाजपाने कितीही प्रयत्न केला तरी त्यात त्यांना यश येणार नाही.

२०१४ साली रामलीला मैदानावर संविधान जाळण्यात आले. त्यावर भाजपा सरकार व मोदी सरकाने आजपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही. युपीएससीच्या परीक्षा न घेताच थेट भरती करून एका विशिष्ट जातीच्या मुला-मुलांची संयुक्त सचिव पदावर भरती करून आरक्षणाच्या लाभापासून गरिबांच्या मुलांना वंचित ठेवण्याचे पाप भाजपाने केले. भाजपा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे पहिल्यापासूनच संविधान मानत नाहीत. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानाच्या जागी मनुस्मृती आणून जनतेला पुन्हा गुलाम बनवण्याचा भाजपा व आरएसएसचा कुटील डाव आहे, हे जनतेला माहिती आहे.

देशाची लोकशाही व्यवस्था व संविधान अबाधित रहावे यासाठी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी कन्याकुमारी ते काश्मीर अशी साडेचार हजार किलोमीटरची भारत जोडो यात्रा काढली. त्यानंतर मणिपूर ते मुंबई अशी ७ हजार किलोमीटरची भारत जोडो न्याय यात्रा काढून देश जोडण्याचे व सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचे काम केले. आपले आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, फुले व आंबेडकर यांचा भाजपाच्या नेत्यांनी सातत्याने अवमान केला आहे. महाराष्ट्रातील जनता सुज्ञ असून भाजपाच्या भुलथापांना बळी पडणार नाही, असेही नाना पटोले यावेळी म्हणाले.

## अमित शहा दारात तरी उभे करतील का ? अजित पवारांची हर्षवर्धन पाटलांवर टिका




**इंदापूर :** अजित पवार म्हणाले, सत्तेत असताना तुम्ही फक्त इंदापूर सांभाळू शकला नाही. कर्मयोगी कारखान्याचे वाटोळे केले आहे. विधान परिषद आमदाराच्या ५ जागा भरायच्या बाकी होत्या. त्यात हर्षवर्धन पाटलांना जागा देणार होतो. मात्र, त्यांची थांबायची तयारी नव्हती. विधान परिषदेवर न घेतल्याने ते भाजप सोडून शरद पवारांच्या पक्षात गेले, असा दावाही अजित पवारांनी केला. अमित शहांकडे मी गेल्यानंतर काम होईल, का हा बाबा गेल्यावर काम होईल, अमित शहा याला दारात तरी उभे करतील का? असा सवाल अजित पवारांनी केला.

सुप्रिया सुळेंच्या विजयात आमचा अदृष्य सहभाग, असे विधान हर्षवर्धन पाटील यांनी केले होते. त्यांच्या या विधानाचा अजित पवार यांनी समाचार घेतला. अजित पवारांनी असले आयुष्यात कधी केले नाही. ज्याला निवडणुकीत उभे केले, त्याचे इमाने इतबारे काम केले. मॅच फिक्सिंग प्रकार कधी केलाच नाही. नाहीतर थेट विरोध केला. तुमच्यावर कसा विश्वास ठेवायचा? असा सवाल अजित पवारांनी हर्षवर्धन पाटलांना केला. इंदापूर विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून दत्ता भरणे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. भरणे यांचा अर्ज दाखल करण्यापूर्वी अजित पवारांनी इंदापूर येथे जाहीर सभेत हर्षवर्धन पाटील यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. यावेळी अजित पवार यांनी सागर बंगल्यावर देवेंद्र फडणवीसांसोबत झालेल्या बैठकीतील एक प्रसंगही सांगितला.

३०० कोटी रुपयांचे काय केले? हर्षवर्धन पाटील यांनी एनसीडीच्या माध्यमातून ३०० कोटी रूपये आणले. ते पैसे काय केले? अमित शहा आणि महायुतीकडून गोड-गोड बोलून कामे करून घेतली आणि सोयीचे आले की गेले निघून, अशी टीका अजित पवारांनी केली.

## राजकारणातील सर्व पुतण्यांचा डीएनए सारखाच : छगन भुजबळ



**नाशिक :** समीर भुजबळ यांनी नांदगाव - मनमाड विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या मैदानात उतरण्याची घोषणा केली आहे. यामुळे त्यांच्यावर महायुतीच्या विरोधात जाण्याचा आरोप होत असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी त्यांच्यावर राजकारणातील सर्वच पुतण्यांचा डीएनए सारखाच असल्याची टीका केली आहे.

समीर भुजबळ यांनी गुरुवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुंबई अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. तसेच नांदगाव - मनमाड विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची घोषणा केली. या ठिकाणी महायुतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे विद्यमान आमदार सुहास कांदे यांना उमेदवारी दिली आहे. परिणामी, समीर यांच्या भूमिकेमुळे महायुतीच्या पोटात गोळा उठला आहे.

विशेष म्हणजे समीर यांच्या कृतीमागे छगन भुजबळ यांचा हात असल्याचाही आरोप केला जात आहे. पण भुजबळ यांनी शुक्रवारी हा आरोप फेटाळला. तसेच राजकारणात सक्रिय असणाऱ्या पुतण्यांचा उल्लेख करत या सर्वांचा डीएनए एकच असल्याचा दावा करत समीर यांच्यावर निशाणा साधला.

छगन भुजबळ शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, राजकारणात असणाऱ्या सर्वच पुतण्यांचा डीएनए एकसारखाच आहे असे मला वाटत आहे. शरद पवार यांचा पुतण्या, अजित पवारांचा पुतण्या, बाळासाहेब ठाकरे यांचा पुतण्या अशी अनेक पुतणे कंपनी आहे. हे सर्वचजण काकांचे ऐकतात असे वाटत नाही. त्यामुळे राजकारणातील सर्वच पुतण्यांचा एक वेगळाच डीएनए आहे.

समीर यांचा मुंबई अध्यक्षपदाचा राजीनामा

समीर भुजबळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांना पाठवलेल्या आपल्या राजीनामापत्रात म्हणाले की, आदरणीय दादा, साधारण वर्षभरापूर्वी तुम्ही सर्वांनी माझ्यावर विश्वास ठेवून मुंबई अध्यक्षपदाची जबाबदारी माझ्याकडे सुपूर्द केली होती. ही जबाबदारी पार पाडताना अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपण संघटन मजबुतीने उभे केले. यामध्ये जिल्हाध्यक्षापासून बूथपर्यंत संघटनेची बांधणी आपण केली.

मात्र भुजबळ कुटुंबीयांचा ऋणानुबंद असलेल्या नांदगावमध्ये परिस्थिती अतिशय बिकट आहे. गेल्या ५ वर्षांत या मतदारसंघातील वातावरण अतिशय दुषित झालेले असून, येथील नागरिक भयभीत झाले आहेत. नांदगावमधील कार्यकर्ते पदाधिकारी व नागरिकांनी आपली भेट घेऊन याबाबतची कैफियत आपल्यासमोर मांडली. नांदगावमधील नागरिकांची वाढत असलेली मागणी व नांदगावमधील दहशतीचे वातावरण बदलण्यासाठी मी या मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

तरी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा मुंबई अध्यक्षपदाचा मी राजीनामा देत आहे. तो आपण स्वीकारावा अशी नम्र विनंती. आपण आतापर्यंत केलेल्या सहकार्याबद्दल मी आपला ऋणी आहे.

## ५ जागा द्या अन्यथा २५ जागा लढू : महाविकास आघाडीला मित्र पक्षाची तंबी

**मुंबई :** महाविकास आघाडीकडून किमान पाच जागांची मागणी करणाऱ्या समाजवादी पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अबू आझमी यांनी आपल्या मागणीवर ठाम राहण्याची भूमिका मांडली आहे. शरद पवार यांच्याशी नुकत्याच झालेल्या चर्चेनंतर आझमी यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, "शरद पवार यांच्यासारखा मोठा नेता महाविकास आघाडीत दुसरा कोणी नाही, त्यामुळे आम्ही केवळ त्यांच्याकडेच आपली मागणी मांडली आहे.

पाच जागांची यादी मी त्यांच्यासमोर ठेवली आहे. जर या जागांवर आमचा निर्णय झाला नाही, तर माझ्याकडे २५ उमेदवार तयार आहेत, आणि आम्ही स्वतंत्रपणे लढण्याची तयारी केली आहे."

आझमी यांनी काँग्रेसवरही टीका केली, "माझी काँग्रेसकडून यापूर्वी दोन वेळा फसवणूक झाली आहे. शेवटच्या क्षणापर्यंत वाट पाहा असे सांगितले जाते आणि शेवटी उमेदवारी नाकारली जाते. आता मात्र आम्ही तीच चूक पुन्हा करू इच्छित नाही."

शरद पवार यांनी आझमी यांना एक दिवस थांबण्याचा सल्ला दिला आहे. आझमी यांनी त्याला मान्यता दिली असून, ते म्हणाले, "जर ५ जागांची घोषणा झाली, तर मी आघाडीत राहण्यास तयार आहे.

पण जर तसे झाले नाही, तर आमचे २५-३० उमेदवार निवडणूक लढवतील, आणि आघाडीतून बाहेर पडण्यासही आम्ही तयार आहोत."

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २६ ऑक्टोबर २०२४

# संभाजीनगर मध्य मतदारसंघात तिरंगी लढत


आमदार प्रदीप जैस्वाल


किशनचंद तनवाणी


नासेर सिद्दिकी

**छत्रपती संभाजीनगर :** खासदार असदुद्दीन ओवैसी यांच्या एमआयएम पक्षाच्या वतीने औरंगाबाद मध्य मतदारसंघात या वेळी इम्तियाज जलील यांच्या ऐवजी नासेर सिद्दिकी यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

पक्षाच्या वतीने ओवैसी यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. त्यामुळे आता मध्य मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान आमदार प्रदीप जैस्वाल यांच्याविरुद्ध उद्धव ठाकरे गटाचे किशनचंद तनवाणी आणि एमआयएमचे नासेर सिद्दिकी अशी तिरंगी लढत होणार आहे.

एमआयएम पक्षाने औरंगाबाद जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्राच्या राजकारणात याच मतदारसंघाच्या माध्यमातून प्रवेश केला होता. २०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत इम्तियाज जलील यांनी विजय मिळवत तत्कालीन भाजप- शिवसेना युतीचा पराभव केला होता. त्यानंतरच इम्तियाज जलील यांनी औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातून विजय मिळवत थेट दिल्ली गाठली होती. मात्र, २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीतील इम्तियाज जलील यांचा पराभव झाला.

त्यामुळे आता ते पुन्हा याच मतदारसंघातून विधानसभेला सामोरे जातील, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र आता पक्षाच्या वतीने नासेर सिद्दिकी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.

### शिवसेना विरुद्ध शिवसेना लढत, तिरंगी सामना

या मतदारसंघांमध्ये शिवसेना विरुद्ध भाजप आणि एमआयएम अशी लढत तिरंगी लढत २०१४ मध्ये देखील पाहायला मिळाली होती. त्यावेळी शिवसेना विरुद्ध भाजप यांच्यामध्ये झालेल्या मतविभाजनाचा फायदा एमआयएम पक्षाला झाला होता. मात्र २०१९ च्या निवडणुकीत पुन्हा एकदा या मतदारसंघात शिवसेनेचा भगवा फडकला. मात्र त्यानंतर शिवसेचे विभाजन झाले आणि या मतदारसंघातील विद्यमान आमदार प्रदीप जयस्वाल हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत सत्तेत सामील झाले.

त्यामुळे आता या मतदारसंघात उद्धव ठाकरे यांची शिवसेना विरुद्ध एकनाथ शिंदे यांची शिवसेना अशी लढत होत आहे. त्यातच आता एमआयएम पक्षाच्या वतीने देखील उमेदवार देण्यात आला आहे. आता या मतदारसंघात नासेर सिद्दिकी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे प्रदीप जैस्वाल, किशनचंद तनवाणी आणि नासेर सिद्दिकी अशी तिरंगी लढत पाहायला मिळेल.

# उद्धव ठाकरेंनी काँग्रेसच्या जागा परस्पर जाहीर केल्या : नीतेश राणे

**मुंबई :** उद्धव ठाकरे दिल्लीत काँग्रेसची ज्या जागांची चर्चा प्रलंबित होती, त्या जागेवर आपले उमेदवार जाहीर करून मोकळे झाले. त्यांना बेईमानीशिवाय दुसरे काहीच येत नाही, अशी जहाल टीका भाजप आमदार नीतेश राणे यांनी शुक्रवारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधताना म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी आतापर्यंत आपल्या ६५ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. यातील काही जागांवर महाविकास आघाडीतील घटकपक्षांनी हरकत घेतल्यामुळे त्यात बदल होण्याची शक्यता आहे. याविषयी राजकीय वर्तुळात विविध अटकळी व्यक्त होत असताना नीतेश राणे यांनी यावरून ठाकरेंवर निशाणा साधला. ते म्हणाले, महाविकास आघाडीचे जागावाटप सुरू असताना ठाकरे गटाकडून मातोश्रीवर बोलावून एबी फॉर्म वाटले जात आहेत. पण त्यातील किती जागा काँग्रेसला द्यायच्या ठरल्या होत्या?

### काँग्रेसला झुकते माप का नाही?

ठाकरे गटाकडून स्वतःच्या मित्र पक्षांना भीक न घालण्याचे काम सुरू आहे. दिल्लीत काँग्रेसची ज्या जागांवर चर्चा प्रलंबित होती, त्या जागा ठाकरेंनी परस्पर जाहीर करून टाकल्या. जे उद्धव स्वतःच्या वडिलांचे झाले नाही, ते काँग्रेस व शरद पवार गटाचे काय होतील? त्यांनी बेईमानीशिवाय आतापर्यंत कोणतेही काम केले नाही. उद्धव ठाकरे यांनी कोकणातून काँग्रेसला हद्दपार केले. संपवून टाकले. ठाकरे गट कोकणातील सर्व जागा लढवणार असेल तर मग विदर्भात काँग्रेसला झुकते माप का नाही? असा सवालही नीतेश ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केला.

### राहुल गांधींना मातोश्रीचा पत्ता तरी माहिती आहे का?

नीतेश राणे म्हणाले, बाळासाहेब ठाकरे हयात असताना सर्व मोठे नेते मातोश्रीवर यायचे. पण आता राहुल गांधी १० जनपथवरून मातोश्रीवर आले का? त्यांना मातोश्रीचा पत्ता तरी माहिती आहे का? त्यानंतर उद्धव ठाकरे मुख्यमंत्रीपदासाठी काँग्रेसच्या मागे पाळीव कुत्र्यासारखे फिरत आहेत.

महाविकास आघाडीच्या जागावाटपानंतर उद्धव ठाकरे यांना भाजपसोबतच्या जागावाटपाची आठवण आली असेल. युतीमध्ये त्यांना १२० जागा मिळायच्या. पण महाविकास आघाडीत त्यांना आता नाक घासून १०० ही जागा मिळत नाहीत. आदित्य ठाकरे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात निवडणूक लढवणार होते. त्याचे काय झाले? आदित्य ठाकरे केवळ वडिलांसारख्या सुक्या धमक्या देतो का? असेही नीतेश राणे यावेळी बोलताना म्हणाले.

# महाविकास आघाडीच्या उमेदवार यादीत बदल होणार - नाना पटोले

**मुंबई :** महाविकास आघाडीतील घटकपक्षांनी एकमेकांच्या काही उमेदवारांवर आक्षेप घेतलेत. त्यामुळे मविआच्या उमेदवार यादीत किरकोळ फेरबदल होण्याची शक्यता आहे. या प्रकरणी नेमक्या किती उमेदवारांची नावे बदलण्यात येतील हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्यासह काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही याची वाच्यता केल्यामुळे काही ठिकाणच्या घोषित उमेदवारांची नावे बदलली जाण्याची शक्यता आहे.

महाविकास आघाडीतर्फे आतापर्यंत ठाकरे गटाने ६५ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. त्यानंतर काँग्रेसने ४८, तर राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने ४५ उमेदवारांची पहिली यादी घोषित केली. ठाकरे गटाने काँग्रेसच्या वाट्याला गेलेल्या काही जागांवर चुकीने उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. त्यामुळे संजय राऊत यांनी उमेदवार यादीत बदल करण्याचे संकेत दिलेत. महाविकास आघाडीच्या जाहीर झालेल्या उमेदवारांच्या एखाद-दुसऱ्या नावावर पुन्हा चर्चा होऊ शकते. एखादे नाव बदलले जाऊ शकते, असे ते म्हणालेत. रामटेकच्या जागेवर शिवसेनेचा विद्यमान आमदार आहे. त्यामुळे तिथे काय करायचे याचा निर्णय आम्ही घेणार आहोत, असेही संजय राऊत यावेळी बोलताना म्हणाले.

### काँग्रेसच्या स्क्रीनिंग कमिटीपुढे ४० नावांवर चर्चा

संजय राऊत यांच्यानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही आघाडीच्या उमेदवार यादीत बदल होण्याची पुष्टी केली आहे. नाना पटोले म्हणाले की, आमची चर्चा सुरू आहे. उमेदवारांच्या यादीत काहीतरी बदल होतील. काही बदल झाले तर ते सर्वांपुढे येतील. पण किती जागांवर हा बदल होईल हा आकडा आताच सांगता येणार नाही. आज सायंकाळी काँग्रेस पक्षाच्या स्क्रीनिंग कमिटीची बैठक होईल. त्यात जवळपास ४० जागांवर चर्चा होईल. या बैठकीत काँग्रेसच्या हायकमांडशी चर्चा झाल्यानंतर यादीत बरेच बदल झालेले दिसून येतील. काँग्रेसच्या उमेदवारांची दुसरी यादी आज सायंकाळपर्यंत जाहीर होणार असल्याचेही पटोले यांनी यावेळी सांगितले.

# मविआचा ९०-९०-९० चा नवा फॉर्म्युला



**मुंबई :** महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा एक नवा फॉर्म्युला पुढे आला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना महाविकास आघाडीतील तिन्ही प्रमुख पक्ष प्रत्येकी ९० जागांवर लढणार असल्याचे स्पष्ट केले. काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हे तिन्ही पक्ष प्रत्येकी ९० जागांवर लढतील, तर उर्वरित १८ जागा मित्रपक्षांना सोडल्या जातील, असे ते म्हणाले.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बुधवारी सायंकाळी घेतलेल्या एका पत्रकार परिषदेत आघाडीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर केला होता. मविआतील तिन्ही पक्ष प्रत्येकी ८५ जागांवर लढणार असल्याचे ते म्हणाले होते. पण काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी शुक्रवारी दिल्लीत बोलताना त्यांनी हा फॉर्म्युला आता ९० वर पोहोचल्याचे सांगितले. ते म्हणाले, आमचा ८५-८५-८५ चा फॉर्म्युला आता ९०-९०-९० वर पोहोचला आहे. उर्वरित १८ जागा आम्ही आमच्या मित्रपक्षांना सोडल्या आहेत. त्यातून किती सुटतील ते पाहिले जाईल. पण काँग्रेस १०० च्या वर जाईल का? याची बेरीज अजून करण्यात आली नाही.

आमची चर्चा अजूनही सुरू आहे. आमचे उमेदवार सक्षम आहेत. त्यांच्यावरही चर्चा झाली आहे. आम्ही सीईसीपुढे ही नावे ठेवणार आहोत. पण महाविकास आघाडीत कुठेही मैत्रीपूर्ण लढत होणार नाही. ही राज्याची निवडणूक आहे. त्यामुळे काही अडचणी असतात. पण त्यावरही तोडगा काढला जात आहे, असे ते म्हणाले,

### सीईसीमध्येच सर्व जागांवर शिक्कामोर्तब होईल - पटोले

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही यावेळी सर्वच जागांवर सीईसीमध्ये शिक्कामोर्तब होईल असे सांगितले. आज आमची ५५ जागांवर चर्चा झाली. त्यात मैत्रीपूर्ण लढतींचा कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. सीईसीमध्ये सर्व जागांवर शिक्कामोर्तब होईल. हा निर्णय पक्षश्रेष्ठीच घेतील, असे ते म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे महाविकास आघाडीने आतापर्यंत १५८ जागांवरील उमेदवार जाहीर केलेत. यात राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या ४५, ठाकरे गटाच्या ६५ व काँग्रेसच्या ४८ उमेदवारांचा समावेश आहे. विरोधी पक्षांच्या उर्वरित उमेदवारांच्या नावांची घोषणा आज किंवा उद्या होण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीसाठी २९ ऑक्टोबर हा अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २६ ऑक्टोबर २०२४


# कला महाविद्यालय बिडकीन येथे रक्तदान शिबिर संपन्न




**बीडकीन** : एकता शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला महाविद्यालय बिडकीन ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक २४ ऑक्टोबर २०२४ रोजी 'राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत रक्तदान शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते.

यावप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन आहेर सर हे उपस्थित होते. यांनी रक्तदानाचा महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना रक्तदान करण्यास प्रेरित केले. कार्यक्रमाचे आयोजन नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. मुजीब सय्यद व डॉ.काटकर अर्चना यांनी केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मिलिंद ठोकळे यांनी केले यावप्रसंगी २० स्वयंसेवकांनी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विभागीय रक्तकेंद्र येथील डॉ.गुल्फाम (bto) डॉ.साईदीप, डॉ.मंगेश, श्रीमती-अनुसया घोगरे (समाजसेवा अधीक्षक)श्री. नागनाथ पाध्ये (टेकनिशियन) स्नेहा, (Bpmt studet) बबन वाघ,अविनाश देहाडे मजहर शेख, हैदर (bpmt) व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

## मनोज पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**कन्नड (अक्षय चव्हाण)** : कन्नड-सोयगाव विधानसभा मतदार संघासाठी उद्योजक मनोज पवार यांनी शुक्रवार २५ ऑक्टोबर रोजी समर्थकांच्या प्रचंड गर्दीसह उमेदवारी अर्ज दाखल केला.
यावेळी बोलातना मनोज पवार म्हणाले की, आज गर्दी, उपस्थितांचे प्रेम व आशिर्वाद पाहून असे वाटते की, मतमोजणीच्या दिवशी आपलाच गुलाल पक्का आहे असे सांगून उपस्थितांचे आभार मानले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धा

**अमरावती** : शिक्षण महर्षी पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेत यजमान संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संघाला पराभवाचा सामना करावा लागला. या चुरशीच्या लढतीत पारूल विद्यापीठ वडोदरा संघाने अमरावती विद्यापीठ संघाचा २३ विरुद्ध ३० असा सात गुणांनी पराभव केला.

प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादात मैदानात उतरलेला अमरावतीचा संघ मध्यंतरापर्यंत १२ विरुद्ध ११ असा एका गुणाने आघाडीवर होता. क्षणाक्षणाला या सामन्याचे पारडे एक दुसरीकडे झुकत होते. शेवटच्या दोन मिनिटापर्यंत अमरावती संघाने अल्पशी बढत मिळवली होती. परंतु पारूल विद्यापीठाच्या खेळाडूंनी शेवटच्या काही मिनिटांत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अमरावती संघाला सात गुणांनी पराभूत केले.

हातात आलेला सामना अमरावती संघ गमावून बसल्याने पुढील फेरीत या संघाला प्रवेश करता आला नाही. पारूल विद्यापीठ संघातर्फे पलक आणि पनवर या खेळाडूंनी आक्रमक चढाई करत आपल्या संघाला विजयश्री मिळवून दिली. अमरावती संघातर्फे अक्षता धानोरकर, मंजुळा पवार आणि पायल श्रीनाथ यांच्या उत्कृष्ट खेळीनंतरही संघाला विजय मिळवता आला नाही.

# ढोरेगाव जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे मतदार जनजागृती अभियान





**ढोरेगाव (राजेश हिवाळे)** : विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १००% मतदान व्हावे याकरिता मतदार जनजागृती अभियानांतर्गत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा ढोरेगाव तर्फे मतदार जनजागृती होण्याकरिता शुक्रवार २५ ऑक्टोबर रोजी प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले.

प्रत्येक नागरिकांनी मतदान करणे गरजेचे आहे व त्याकरिता शासन विविध स्तरावर जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.लोकशाहीच्या मतदान प्रक्रिया, राष्ट्रसेवेमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांचाही समावेश असावा अशा उदात्त हेतूने मतदार जनजागृती करिता प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते.

केंद्रप्रमुख दत्तात्रय दांडेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी 'मतदान करा सर्व नर आणि नारी, ही आहे प्रत्येक मतदाराची जबाबदारी', 'देशाचे भाग्यविधाते व्हा, नागरिकहो, जागरूक होऊन मतदार यादीत नाव नोंदवा','मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो', 'वृद्ध असो की जवान, सर्वजण करा मतदान' अशा जनजागृतीपर घोषणा विद्यार्थ्यांनी दिल्या. शाळेने राबवलेल्या या उपक्रमाबाबत पालकांनीसुद्धा विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले.नागरिकांनी यास भरभरून प्रतिसाद दिला. केंद्रप्रमुख दत्तात्रय दांडेकर, मुख्याध्यापिका अंजली पुऱ्हे,पदवीधर शिक्षक राजेश हिवाळे, राजश्री वानखडे, शंकर राऊत, बसवराज उदे, रीना लोहार, भारती भोये, वंदना निधोनकर, मनोज मस्के, नीलिमा कुलकर्णी, जयश्री भादे, सचिन पाटसकर, आश्विनी कांबळे यांनी या प्रभातफेरीचे उत्तम नियोजन केले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २६ ऑक्टोबर २०२४


## फोडाफोडीबद्दल शरद पवारांना नोबेल दिला पाहिजे - उदयनराजे



**सातारा :** नेत्यांच्या फोडाफोडीबद्दल शरद पवारांना नोबेल पुरस्कारच दिला पाहिजे, अशी खोचक टीका भाजपचे खासदार उदयनराजे भोसले यांनी कराड येथे बोलताना केली. महायुतीचे उमेदवार डॉ. अतुल भोसले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. आपल्या सोयीसाठी जे इकडे तिकडे गेले असतील, त्यांना लोक माफ करणार नाहीत, असंही उदयनराजे म्हणाले.

निवडणुकीच्या काळात कोणी इकडे तिकडे गेले असतील. परंतु, दुष्काळी भागात औद्योगिकरण, पाणी योजना कोणाच्या काळात झाल्या? असा सवाल करून खासदार उदयनराजे म्हणाले, खंडाळा, माण, खटाव, फलटण या दुष्काळी भागात पाणी पोहोचलं. त्यातून त्या भागाच्या विकासाला गती आली. त्यामुळे लोक कोणाला निवडून द्यायचं ते ठरवतील. खा. उदयनराजे म्हणाले की, कराड दक्षिणमधील महायुतीचे उमेदवार डॉ. अतुल भोसले हे मताधिक्क्याने निवडून येतील. कारण, त्यांचं कामच बोलतंय. त्यामुळे मी फार काही सांगायची गरज नाही. महायुतीचे सर्व पदाधिकारी त्यांच्या विजयासाठी आहोरात्र काम करत आहेत. त्याची परिणती विजयात होईल.

आमचे सरकार आल्यानंतर बोगस टेंडरची चौकशी करणार असल्याचा इशारा पृथ्वीराज चव्हाणांनी दिला होता. त्याला प्रत्युत्तर देताना डॉ. अतुल भोसले यांनी शासन निर्णय आणि बांधकाम विभागाकडील पत्र माध्यमांसमोर सादर केले. विद्यमान आमदारांनी धडधडकीत खोटा आरोप केला आहे. कामाचे टेंडर प्रसिध्द झाले असून ट्रेझरीत ९ कोटी ६५ लाख रूपये देखील आले आहेत. माध्यमांशी याची शहानिशा करून वस्तुस्थिती जाणून घेण्याचं आवाहन डॉ. भोसले यांनी केलं.

## रंजना गवळी-सोनवणे मराठी विषयात नेट उत्तीर्ण



**वैजापूर — (राजेश हिवाळे) :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा लोणी, ता. वैजापूर येथील सहशिक्षिका रंजना गवळी-सोनवणे या प्राध्यापक पदासाठी आवश्यक 'नेट' परिक्षेत उत्तीर्ण झाल्या आहेत.

त्यांच्या या यशाबद्दल शिक्षक संघाचे तालुका अध्यक्ष कल्याण राऊत, गंगापूर तालुका शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन संजय भडके, सचिव प्रदिप जाधव, संचालक सचिन वालतूरे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## शिक्षण उपसंचालक डॉ. बी. बी. चव्हाण यांचा सत्कार



**छत्रपती संभाजीनगर —** महाराष्ट्र मायनारिटी एज्यूकेशन असोसिएशन आणि नॅशनल उर्दू टिचर युनियनच्या वतीने छत्रपती संभाजीनगर विभागाचे शिक्षण उपसंचालक डॉ. बी. बी. चव्हाण यांचा प्रा. शेख मंसुर आणि मिर्झा सलीम बेग यांनी सत्कार केला.

या प्रसंगी वाणी साहेब, तुपे साहेब, तेजराव गाडेकर, प्रियाराणी पाटील, मोहन चव्हाण आदी उपस्थित होते.

## जामिया औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण




**अक्कलकुवा :** देशाच्या प्रगतीसाठी युवक व विद्यार्थ्यांनी कौशल्य ज्ञानाबरोबर आपल्या चारित्र्यही उत्तमरीत्या घडवावे. कारण आपल्या चांगल्या चरित्र्यानेच समाजात, देशात आपली ओळख निर्माण होते. त्यामुळे शिस्तीने वागा, असे प्रतिपादन जामिया इस्लामिया इशाउतुल उलूम संस्थेचे अध्यक्ष मौलाना हुजेफा वस्तानवींनी केले.

येथे जामिया औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या सभागृहात विविध ट्रेड मध्ये गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रस्तावित जी.एम. वस्तानवी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.अकील सैय्यद, पॅरामेडिकल सायन्स कॉलेजच्या माजी प्राचार्य आयेशा सैय्यद, संस्थेचे प्राचार्य अकबर पटेल आदी उपस्थित होते. यावेळी विविध ट्रेड मधून या वर्षी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या व संस्थेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना संस्थाध्यक्ष मौलाना हुजेफा वस्तानवी व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

याप्रसंगी यावेळी डॉ.सैय्यद यांनी मार्गदर्शन केले. तर प्राचार्य अकबर पटेल यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या कामगिरीचा अहवाल सादर केला. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मौलाना गुलाम वस्तानवींनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास उपप्राचार्य इलियास पटेल यांच्यासह प्रशिक्षण संस्थेचे शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. प्रगतीसाठी सर्वांनी प्रेम, एकोप्याने राहाणे गरजेचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मौलाना वस्तानवी म्हणाले की, शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांनी जिद्द आणि परिश्रमाने शिकून कौशल्य प्राप्त करावे. कौशल्यासोबत उत्तम चारित्र्य घडवावे. त्याशिवाय कौशल्यास अर्थ नाही. ज्या देशात अशांती, अराजकता, भेदभाव, आणि हिंसा असते तो देश कधीच प्रगती करत नाही. त्यामुळे प्रगतीसाठी सर्वांनी प्रेम, एकोपा, समानता व बंधुभावाने रहावे असे आवाहनही त्यांनी केले.